अशी स्त्री जिने प्रत्येक गोष्टीत चांगलं बघितलं

पैट डेकर टैपिओ
चित्र : पॉल गैल्डोन
मराठी : अश्विनी बर्वे

दिवसेंदिवस पाऊस पडत होता . नदीला पूर आला होता आणि सगळीकडे पाणी वाहत होते . तिथेच ती स्त्री राहत होती . वाहणारे सगळे पाणी तिच्या घरात घुसले आणी तिचे घर वाहून गेले .

“चला, बरंच झालं ,” नेहमी सगळ्यात चांगलं बघणारी स्त्री म्हणाली .

“मला तसंही एक नवीन घर पाहिजेच होते .”

ही तर या स्त्रीच्या अविश्वसनीय प्रवासाची सुरुवात होती . जो प्रवास तिला आणि तिच्या मांजरीला नदीपासून समुद्रापर्यंत आणि अर्ध्या जगाला चक्कर मारायला घेऊन गेला . काहीही होवो रस्त्यात तिच्यावर अनेक संकटे आली , पण त्यातही तिने काही ना काही चांगलं बघितलं . शार्कला बघून मांजराने जी प्रतिक्रिया दिली त्याला ह्सण्यापासून ते चीनची भव्य भिंत बघण्याचा , तसेच पॉल गैल्डोनच्या चित्रातले जबरदस्त कौशल्य बघण्यापर्यंत तिच्याकडे अनुभव जमा झाले होते .

गोष्ट आणि चित्रांमुळे ही एक मोठी गोष्ट झाली आहे , ती

ती स्त्री जिने प्रत्येक गोष्टीत चांगलं बघितलं

पैट डेकर टैपिओ
चित्र: पॉल गैल्डोन
मराठी: अश्विनी बर्वे

वसंतातली एक सुंदर सकाळ! “किती छान दिवस आहे, चला नदीवर फिरायला जाऊ या,” स्त्रीने मांजराला म्हटले. तिने स्वादिष्ट पदार्थ बरोबर घेतले आणि त्या दोघी निघाल्या. जेव्हा त्या दाट झाडाच्या खाली पोहचल्या, तेव्हा स्त्रीने एक सतरंजी घातली आणि पेटी उघडायला सुरुवात केली.

ढग जमा झाले आणि अचानक पावसाचे मोठे मोठे थेंब पडू लागले . “चला चांगलं झालं , स्त्रीने आपल्या वस्तू आवरत म्हटले , “पाऊस फुलांसाठी चांगला आहे .”

दिवसेंदिवस पाऊस पडतच राहिला. त्यामुळे फुलांची झाडे जमिनीवरून उखडली गेली आणि नदी पूर्ण भरली.

नदीला उधाण आले , पूर आला आणि ती स्त्री जिथे राहत होती त्या घरापर्यंत पाणी आले.



वेगाने वाहणाऱ्या पाण्याने तिचे
छोटेसे घर वाहून नेले . "चला, चांगलं
झालं , “नेहमीसारखे चांगली बाजू बघत
स्त्री म्हणाली , “तसेही मला नवीन
घर पाहिजेच होते .”



मग पुराने त्या स्त्रीला आणि तिच्या मांजराला आपल्याबरोबर वाहून नेले. स्त्रीने हात लांब करून झाडाचा ओंडका पकडला.

"अच्छा, ठीक आहे," ती म्हणाली. "मला नेहमी नदीच्या किनाऱ्यावरून फिरायची इच्छा होती."

ती स्त्री आणि तिचे मांजर ओंडक्यावर बसले कारण तो नदीच्या किनाऱ्यावर वाहत होता . “असे वाटते की आपण समुद्राकडे जात आहोत,” स्त्री म्हणाली . “चांगलं आहे मला नेहमीच समुद्रावर जायची इच्छा होती .”



समुद्राच्या लाटा खूप वेगाने येत होत्या. त्यामुळे ओंडका समुद्रात वेगाने वाहू लागला. थोड्याच वेळात जमीन दिसेनाशी झाली.

“इथे किती शांत वातावरण आहे,” स्त्री आपल्या मांजराला म्हणाली. “कधी-कधी सुट्टी घालवायला बाहेर जाणे चांगले असते.”

त्या महिलेने आणि तिच्या
मांजराने सुंदर सूर्योदय आणि
सूर्यास्त बघितले .



शेवटी तिला खूप दूरवर जमीन दिसले आणि तिला आश्चर्य वाटले. “तो कोणता देश असेल याचे मला कुतूहल वाटते.” ती मनातल्या मनात म्हणाली.

“आपण चीनपर्यंत प्रवास केला की काय?”

वास्तवात, ती चीनच्या तटावर उतरणार होती, नदीवरील आपल्या छोट्याशा घरापासून तिने जगाचे अर्धे अंतर कापले होते.



जसजसा ओंडका जवळ येत गेला , तिला अनेक चिनी नावा आणि अनेक अनोळखी पक्षी मासे पकडण्यासाठी पाण्यात डुबकी मारतांना दिसू लागले .

जेव्हा ती किनाऱ्याकडे जात होती , तेव्हा चिनी मासेमाऱ्यांनी तिला हात हलवून इशारा केला आणि त्यांच्या भाषेत तिला हाक मारली .

तेव्हा तिने विचार केला , “किती आश्चर्याची गोष्ट आहे मला नेहमीच चिनी भाषा शिकायची इच्छा होती .”

शेवटी ओंडका किनाऱ्यावर आला . ती जमिनीवर उतरली आणि आपले पाय जमिनीला लावले . मांजराने पण पटकन उडी मारली .

“काय सुंदर प्रवास होता हा .” आणि ती आणितिचं मांजर जमिनीवर चालू लागले .

जसजसे चालत गेले , तोपर्यंत तिने एवढी चिनी भाषा



“ही तेवढीच सुंदर आहे, जेवढा मी विचार केला होता,” ती म्हणाली.



महिलेला भिंतीजवळ एक छोटेसे घर सापडले , ते रिकामे होते . ती आणि तिचे मांजर दोघी तिथे राहू लागल्या . जशी ती तिथे पोहचली पाऊस सुरु झाला .

ती दरवाज्यात उभे राहून पाऊस बघू लागली . तिने एक दीर्घ श्वास घेतला .

"अच्छा , ठीक आहे ," तिने शेकोटी अधिक ज्वलंत करत म्हटले . "पाऊसामुळे तांदूळ चांगले पिकतील ."